महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर - ४१६ ००४
Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Rajendranagar, Kolhapur - 416 004

Phones: Chairman 0231-2690829 Secretary 0231- 2691405 FAX : [0231] 2690758
PBX - 0231-2696101, 2696102, 2696103 E-Mail: divsec.kop@gmail.com

क्र.को.वि.मं./शाखा लेखा/परीक्षा फी/ 2407
कोल्हापूर ४१६००४
दिनांक -१७/१/२०२२

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,
जिल्हा सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय - फेब्रुवारी - मार्च २०२१ परीक्षेचे इ. १० वी व इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परतावासाठी मुदतवाढ देणेबाबत.**

संदर्भ - १. राज्य मंडळ, पुणे यांचे क्र.रा.मं./लेखा-६/१०२ दिनांक १०/०५/२०२२ चे पत्र
२.राज्य मंडळ, पुणे यांचे क्र. रा.मं./लेखा-६/२४५, दिनांक १४/१/२०२२ चे पत्र

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालय, मुंबई जनहित याचिका क्र. ३९/२०११ या याचिकेवरील दिनांक २९/०७/२०२१ रोजीचे आदेशानुसार मा. अध्यक्ष, राज्य मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी-मार्च २०२१ चे परीक्षेकरिता नोंदणी केलेल्या इ.१० वी व इ.१२ वीच्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे रू ५९/- व ९४/- परीक्षा शुल्काची रक्कम परत करण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे. त्याअनुषंगाने आपणास आपल्या शाळेतील/कनिष्ठ महाविद्यालयातील फेब्रुवारी-मार्च २०२१ चे परीक्षेसाठी इ. १० वी व इ. १२ वीच्या नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची तपशीलवार माहिती दि.३१/१२/२०२१ पर्यंत संकलित करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि काही शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी अद्याप यासंदर्भात प्रस्ताव सादर केलेले नाहीत.

सबब सदर योजनेस दिनांक १५/०१/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना परीक्षा शुल्क परताव्याची नोंदणी करण्यास ऑनलाईन अडचणी येत असल्याने सदर योजनेस पुनश्च दि.३१/१/२०२२ पर्यत मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी उपरोक्त कार्यवाही तातडीने कालमर्यादेत करण्यात यावी. सोबत सदर योज़नेच्या कार्यपध्दतीच्या महत्त्वाच्या सूचना पत्र माहितीसाठी देण्यात येत आहे.

**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**
**यांचेकरिता**

(२६)

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे – ४११००४.

विषय:– सन २०२१ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) साठी नोंदणीकृत विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क परतावा करण्याबाबतची कार्यपध्दती.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचकडे दाखल जनहित याचिका क्र. ३९/२०२१ या याचिकेवरील दिनांक २९/०७/२०२१ रोजीचे निर्णयानुसार मा. अध्यक्ष, राज्यमंडळ,पुणे यांनी सन २०२१ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) चे परीक्षेकरिता नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु ५९/– व रु ९४/– परीक्षा शुल्काची रक्कम परत करण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे.

माध्यमिक शाळेतील/कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वीच्या ज्या विद्यार्थ्यांना शासन योजना व इतर अन्य योजनांमधून परीक्षा शुल्काचा लाभ मिळत आहे त्या विद्यार्थ्यांना या परीक्षा शुल्काचा दुबार लाभ मिळणार नाही, तसेच जे विद्यार्थी सन २०२१ च्या मुख्य परीक्षेला प्रविष्ठ झालेले व शासन निर्णयानुसार निकाल तयार न केल्यामुळे नोव्हेंबर–डिसेंबर २०२१ च्या पुरवणी परीक्षेस श्रेणीसुधार योजने अंतर्गत (CIS) प्रविष्ठ झाले आहे अशा विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क आकारण्यात आले नाही. त्यामुळे त्यांना या योजनेसाठी पात्र करू नये, याची दक्षता घेवूनच विद्यार्थ्यांची माहिती देण्यात यावी.

**माध्यमिक शाळांना द्यावयाच्या सविस्तर सूचना खालीलप्रमाणे –**

१. सदर योजनेचा लाभ घेण्याकरिता तपशिलवार माहिती आवेदनपत्र भरलेल्या शाळांच्या लॉगइनमध्ये मंडळाचे अधिकृत संकेतस्थळावरून १) इ. १० वी व १२ वी साठी mahahsscboard.in २) इ. १० वी साठी https://feerefund.mh-ssc.ac.in व ३) इ. १२ वी साठी https://feerefund.mh-hsc.ac.in ह्या लिंकवर प्रसिध्द करण्यात आली आहे.
२. लॉगइन व पासवर्डचा वापर करून उपलब्ध होणाऱ्या फॉर्ममध्ये शाळेने अचूक माहिती भरण्यात यावी. विद्यार्थ्यांना पात्र व अपात्र करताना दुबार लाभाबाबत आपल्याकडील अभिलेखांवरून खात्री करूनच माहिती भरण्यात यावी. सर्व विद्यार्थ्यांची पात्र व अपात्र बाबतची माहिती भरल्याशिवाय सदर कार्यप्रणाली पुढील कार्यवाहीसाठी जाणार नाही. तसेच पात्र व अपात्र विद्यार्थ्यांबाबत माहिती आपल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे सूचना फलकावर विद्यार्थ्यांचे माहितीसाठी लावण्यात यावी.
३. सदर योजनेचा लाभ प्रत्येक पात्र विद्यार्थ्यांना मिळण्याकरिता मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी विविध माध्यमाचा (ई–मेल, एस.एम.एस., पत्र, दूरध्वनी इ.) उपयोग करून विद्यार्थ्यांपर्यंत सदर योजना पोहोचेल याची खातरजमा करण्यात यावी.
४. विद्यार्थ्यांना पात्र व अपात्र केलेबाबतचे प्रमाणपत्र आपल्या स्तरावर जतन करून ठेवावे.
५. शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी आपले अधिकृत बॅंक खाते व त्याचा तपशील निर्धारित केलेल्या रकान्यामध्ये अचूक भरावा. सदर खात्यामध्येच शाळेने सादर केलेल्या माहितीनुसार पात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्काची परतावा रक्कम जमा करण्यात येणार आहे. कोणत्याही परिस्थितीत वैयक्तिक/संस्थेचे बॅंक खात्याची माहिती देण्यात येवू नये.

कृ.मा.प.

६. विद्यार्थ्यांना सदरची रक्कम आपल्या बँक खात्यामध्ये जमा झाल्यापासून ३० दिवसांपर्यंत शाळेने फी ची रक्कम ज्या स्वरूपात स्वीकारली आहे, त्या स्वरूपात परत करण्यात यावी. तद्नंतर आपल्याकडे शिल्लक राहीलेल्या परीक्षा शुल्काची रक्कम मंडळाचे बँक खात्यामध्ये त्वरित वर्ग करण्यात यावी. सदर शिल्लक रक्कम जमा करण्याकरिता स्वतंत्र चलन संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. सदर चलनावर बँक खात्याचा तपशील नमूद असणार आहे.

७. माहिती भरल्यानंतर उपलब्ध केलेल्या व्हेरिफाय अँन्ड सबमिट ऑप्शननुसार माहितीची पडताळणी/छाननी करण्यात यावी व त्यानंतर प्रमाणित माहिती दाखल ( सबमिट ) करण्यात यावी.

८. सादर केलेल्या माहितीनुसार पात्र विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्काची एकूण रक्कम आपल्या अधिकृत बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

९. सदर रक्कम आपल्यामार्फत संबंधित पात्र विद्यार्थ्यांना ज्या स्वरूपात त्यांनी आपल्याकडे शुल्क जमा केले आहे त्याचप्रमाणे त्यांना परत करण्यात यावी व त्यांची दिनांकित स्वाक्षरी उपलब्ध करून दिलेल्या प्रपत्रावर घेण्यात यावी. सदर प्रपत्राची स्वाक्षरीनंतरची एक प्रत आपल्याकडे जतन करून ठेवण्यात यावी.

१०. पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क परत दिल्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.

११. विद्यार्थ्यांना परत केलेल्या परीक्षा शुल्काच्या रकमेची माहिती मंडळाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी अपलोड करण्यात यावी.

१२. पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काची रक्कम मंडळाने अदा केलेल्या रकमेतून परत करणेची जबाबदारी ही शाळेची राहील. या संबंधित काहीही गैरप्रकार झाल्यास संबंधित शाळेचे मुख्याध्यापक/प्राचार्य जबाबदार राहतील.

-------x-------